CNR No.MH.JG-2200-0001-2006.

नियमीत दिवाणी दावा क्र.११२/२००६

इंदल वि. हिरा व इतर ८

## आदेश निशाणी क्र.१३६ वर
## (पारित दिनांक १७/०६/२०२६)

१. सदरचा अर्ज वादी यांनी, सामील प्रतिवादी नं. ४ चंद्रकला उर्फ लताबाई भ्र. वसंत राठोड ही मयत झाले असल्याने त्यांचे कायदेशीर वारस अभिलेखामध्ये सामील करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे कथन असे की, सामील प्रतिवादी नं. ४ चंद्रकला उर्फ लताबाई भ्र. वसंत राठोड ही दिनांक ३०.०४.२०२५ रोजी मयत झाली आहे. परंतू तिचे मृत्युची नोंद दि.१४.०५.२०२५ रोजी घेण्यात आली. सदर कामी वादीने तिचे मत्यूचा दाखला मिळणेसाठी ग्रामसेवक ग्रा. पं. वडगांव आंबे, ता. पाचोरा यांचेकडे मृत्यूचे दााखल्याची मागणी केली. परंतू त्यांनी माहितीचे अधिकाराचा अर्ज करणेचा सांगितले. त्यावरुन माहितीचे अधिकारात अर्ज केले नंतर वादीस दि.१३.०८.२०२५ रोजी नक्कल मिळाली. सबब ग्रामपंचायती कडून वेळेवर मृत्यु दाखला न मिळाल्याने वादीस प्रतिवादी वारस रेकॉर्डवर ३० दिवसांचा विलंब झाला असून, सबब विलंब माफिसाठी अर्ज दाखल केला आहे. तरी वरील सामील प्रतिवादी नं. ४ हिचे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावेत प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जाचे स्वरुप पाहता मे. कोर्टाने योगय आदेश करावा, अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी तर्फे सुविज्ञ विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. सामील प्रतिवादी नं. ४ चंद्रकला उर्फ लताबाई भ्र. वसंत राठोड यांचा दिनांक ३०.०४.२०२५ रोजी मृत्यु झाल्याबाबतचे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केलेले आहे. सदरचे

मृत्यु प्रमाणपत्रावर कोणताही आक्षेप नोंदविलेला नाही. सदरचा दावा, वाद मिळकती संदर्भात कायम मनाई हुकूमासाठी दाखल केलेला आहे. सामील प्रतिवादी नं. ४ चंद्रकला उर्फ लताबाई भ्र. वसंत राठोड मयत झाल्यानंतर अर्जातील प्रस्तावीत प्रतिवादी यांचे वारसांचे हक्क, हितसंबंध दावा मिळकतीमध्ये गुंतलेले असल्याचे दाव्यातील कथनावरुन दिसुन येते. त्यामुळे, सामील प्रतिवादी नं. ४ चंद्रकला उर्फ लताबाई भ्र. वसंत राठोड यांचे प्रस्तावीत वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यामुळे, दाव्यातील मुद्यांचा गुणदोषावर न्यायनिर्णय करण्यास मदत होणार आहे. तसेच, प्रतिवादी तर्फे प्रस्तावीत वारस अभिलेखावर घेणेबाबत तसेच विलंब माफिचा निशाणी १३४ वरील अर्ज ,या न्याायालयाने मंजूर केला असून, दाव्याचा गुणदोषावर निकाल होऊन उभय पक्षांमधील वाद संपुष्टात येणेसाठी सामील प्रतिवादी क्र.४ यांचे प्रस्तुत अर्जामध्ये नमूद प्रस्तावीत वारसांना अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व संयुक्तिक होईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होणेस पात्र आहे. त्यामुळे, मी खालील आदेश पारीत करीत आहे –

## <u>आदेश</u>

१. वादी यांचा निशाणी क्र.१३६ वरील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांनी सामील प्रतिवादी नं. ४ चंद्रकला उर्फ लताबाई भ्र. वसंत राठोड यांचे प्रस्तावीत वारसांना कायदयातील तरतुदींनुसार विहीत मुदतीत मुळदाव्यात सामील करावे व तशी दुरुस्ती प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. उभय पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

MINAKSHI MANOHAR DHANRAJ

Digitally signed by MINAKSHI MANOHAR DHANRAJ
Date: 2026.06.17 11:52:05 +0530

(श्रीमती. एम. एम. धनराज)

दिनांकः–१७/०६/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

चाळीसगांव.

**CERTIFICATE**

“ I affirm that the contents of this P.D.F. file order are same word to word as per original order.”

Name of the Stenographer : C. Y. Chimankar.
Court Name : Smt. Minakshi M. Dhanraj,
Jt. Civil Judge J.D., Chalisgaon.
Date : 17.06.2026.
order signed by presiding officer on : 17.06.2026.
order uploaded on : 17.06.2026.